# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
MUHS
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2531836, Ph.: 2539217
Email: coe@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

डॉ. अजित गजानन पाठक | Dr. Ajit Gajanan Pathak
एम.बी.बी.एस.एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र) | M.B.B.S.,M.D.(Forensic Medicine)
**परीक्षा नियंत्रक** | **Controller of Examinations**


जा.क्र.मआविवि/एक्स-३/७०३९८/२०१८ दि.०८/१२/२०१८

**परिपत्रक क्र.९२/२०१८**

**प्रति,**
**मा.अधिष्ठाता/प्राचार्य,**
सर्व संलग्नित आयुर्वेद व युनानी महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

**विषय : आयुर्वेद व युनानी विद्याशाखेंतर्गत महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या सत्रांत चाचणी (अंतर्गत मुल्यांकन) परीक्षेच्या अभ्यासक्रमाबाबत....**

**संदर्भ : १) विद्यापीठ परिपत्रक क्र.१०९/२०१७ दि.११/१०/२०१७**
**२) विद्याशाखेच्या दिनांक ११/०९/२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.०४/२०१८**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संलग्नित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासुन बी.ए.एम.एस. २०१० व बी.ए.एम.एस. २०१२ प्रथम वर्ष ते अंतिम वर्षास प्रवेशित आणि बी.यु.एम.एस. (नवीन) व बी.यु.एम.एस.२०१३ प्रथम वर्ष ते अंतिम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता तीन ऐवजी दोन अंतर्गत मुल्यांकन परीक्षा लागु करण्यात येत असल्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापी, काही अभ्यासक्रम एक वर्ष कालावधिचे तर काही अभ्यासक्रम दिड वर्ष कालावधीचे असल्याने अंतर्गत मुल्यांकन परीक्षा कोणत्या दोन सत्रात आयोजीत करण्यात यावी याबाबत विद्यापीठाकडे विचारणा होत होती. त्याअनुषंगाने सदर विषय विद्याशाखेच्या दिनांक ११/०९/२०१८ रोजीच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता विद्याशाखेने महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या सत्रांत चाचणी परीक्षेकरीता खालील प्रमाणे अभ्यासक्रमाची विभागणी राहील असे ठरले :-

१) आयुर्वेद व युनानी विद्याशाखेतील जे अभ्यासक्रम एक वर्षाचे आहेत अशा अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्रांत चाचणी परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी प्रथम सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारीत होईल व द्वितीय सत्रांत चाचणी परीक्षा द्वितीय सत्राच्या शेवटी द्वितीय सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारीत होईल.

२) आयुर्वेद व युनानी विद्याशाखेतील जे अभ्यासक्रम दीड वर्षाचे आहेत अशा अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्रांत चाचणी परीक्षा दुसऱ्या सत्राच्या शेवटी प्रथम व द्वितीय सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारीत होईल व द्वितीय सत्रांत चाचणी परीक्षा तिसऱ्या सत्राच्या शेवटी तृतीय सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारीत होईल.

यास्तव सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सदर बाब बी.ए.एम.एस. व बी.यु.एम.एस. अभ्यासक्रमासाठीच्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी व परिपत्रकास महाविद्यालय स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीस्तव :-

१) विभाग प्रमुख, आयुर्वेद व युनानी कक्ष (पदवी), शैक्षणिक विभाग

२) परीक्षा नियंत्रक कार्यालय

३) परीक्षा प्रशासन विभाग